**ठळक बातम्या**

- गेल्या ११ वर्षात वाढलेल्या दळणवळण आणि पायाभूत सुविधांमुळे नागरिकांच्या राहणीमानात सुधारणा झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- रायगडमध्ये दिघी आणि छत्रपती संभाजीनगर जवळच्या ऑरिक औद्योगिक वसाहतीत इटालियन कंपन्यांसाठी विशेष सुविधा निर्माण होणार

- राजस्थानमध्ये रस्ते अपघातात वधू - वरासह ५ जणांचा मृत्यू

**आणि**

- ॲक्झिऑम ४ मोहिमेच्या रॉकेटमध्ये त्रुटी आढळल्यानं यानाच्या प्रस्थानाला पुन्हा विलंब

**<><><><><>**

अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्मितीत भारताने घेतलेली झेप ही शाश्वतता आणि दूरदृष्टी या वैशिष्ट्याने प्रेरित आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पायाभूत सुविधांमधल्या क्रांतीची अकरा वर्षे असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात नमूद केलं आहे. रेल्वे, महामार्ग, बंदरे, विमानतळ यासारख्या दळणवळण आणि पायाभूत सुविधांमुळे राहणीमानातील सुविधा तसंच समृद्धीत वाढ झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या वैशिष्ट्यांमुळे आत्मनिर्भर भारताचा पाया घातला गेल्यांचं या संदेशात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

गेल्या अकरा वर्षांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये केंद्र सरकारने केलेल्या क्रांतीमुळे भारताचं नवनिर्माण झालं आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नवनवीन अत्याधुनिक पायाभूत सुविधांमुळे देशाची एकात्मता आणि मजबूती यात भर पडल्याचं शहा यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात

म्हटलं आहे. या सुविधांमुळे व्यापार आणि आर्थिक व्यवहार पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक वेगवान झाले आहेत असं शाह यांनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

सेवा, सुशासन आणि गरिबांचं कल्याण या तत्त्वांनी प्रेरित होऊन भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. यात वाहतुकीशी संबंधित पायाभूत सुविधांमधल्या परिवर्तनाचाही मोठा समावेश आहे. रालोआ सरकारच्या काळात गेल्या दहा वर्षात महामार्ग बांधण्याचं प्रमाण सरासरी ३४ किलोमीटर प्रतिदिन इतकं वाढलं असून ते २०१४च्या प्रमाणाच्या तिप्पट आहे. भारतमाला योजनेंतर्गत आर्थिक कॉरिडोर विकसित करण्यासाठी २० हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे महामार्ग बांधण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाशी संपर्क जवळपास ९९ टक्के इतका वाढला आहे. २०१४पासून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ७ लाख ८० हजार किलोमीटरहून अधिक रस्ते बांधण्यात आले आहेत. पीएम गतिशक्ती योजनेद्वारे पायाभूत सुविधांच्या एकत्रित विकासासाठी ४४ मंत्रालयं आणि ३६ राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशांना जीआयएस आधारित डिजिटल माध्यमातून जोडण्यात आलं आहे. ४५ हजार किलोमीटरहून अधिक मार्गांचं विद्युतीकरण, ३३३ जिल्ह्यांना जोडणाऱ्या ६८ वंदे भारत रेल्वे गाड्या, अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत १ हजार ३०० हून अधिक रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण अशी अनेक विकासकामं गेल्या दशकभरात करण्यात आली आहेत. मेट्रो रेल्वेचं जाळं आता २३ शहरांमध्ये विस्तारलं आहे. सागरमाला योजनेच्या माध्यमातून बंदरांशी संबंधित २७७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उडान योजनेमुळे विमान वाहतूक क्षेत्रात ८८ विमानतळं सक्रिय झाली आहेत. स्टॅच्यू ऑफ युनिटी, चिनाब रेल्वे पूल हे भारताच्या अभियांत्रिकी चमत्कारांचे प्रतीक म्हणून आज उभे आहेत.

**<><><><><>**

भांडवली खर्चात गेल्या अकरा वर्षांमध्ये लक्षणीय वाढ होऊन तो २०२४-२५ मध्ये ११ लाख कोटींवर पोचला असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी  म्हटलं आहे. रालोआ सरकारने अकरा वर्ष पूर्ण केल्याबद्द्ल लिहिलेल्या लेखात वैष्णव यांनी गेल्या दशकभरात प्रत्यक्ष पायाभूत सुविधांमध्ये वेगाने वाढ झाल्यांचं म्हटलं आहे. एकूण ५९ हजार किलोमीटर रस्ते आणि ३७ हजार ५०० किलोमीटर रेल्वे मार्गांचं काम या काळात झाल्याचं त्यांनी या लेखात नमूद केलं आहे.  हर घर जल या योजने मार्फत १ कोटी ४० लाख घरांपर्यंत नळाचे पाणी पोचले आहे तर आयुष्मान भारतमुळे ३ कोटी ५० लाख व्यक्ती आरोग्यविम्याच्या छत्राखाली आल्याचं त्यांनी या लेखात नमूद केलं आहे. याशिवाय गेल्या दहा वर्षामध्ये  ५३ कोटींहून जास्त जनधन खाली उघडली गेली आहेत. ४० दशलक्ष घरं आणि १२० दशलक्ष शौचालयं बांधली गेली  तर १० कोटी कुटुंबांमध्ये लाकडांऐवजी स्वयंपाकाच्या गॅसचा वापर होऊ लागला आहे असंही वैष्णव यांनी या लेखात नमूद केलं आहे.

<><><><><>

दहशतवादाच्या समूळ उच्चाटनासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळाने जगभरात भारताची भूमिका उत्तमप्रकारे मांडल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. ३३ देशांचा दौरा करून परतलेल्या या शिष्टमंडळांची प्रधानमंत्र्यांनी काल भेट घेऊन शिष्टमंडळांच्या या कामगिरीबद्दल अभिमान व्यक्त केला.

<><><><><>

भारत सरकार इटालियन कंपन्यांसाठी “होम अवे फ्रॉम होम” या संकल्पनेवर आधारित समर्पित औद्योगिक वसाहती विकसित करणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी इटली दौऱ्यादरम्यान ही माहिती दिली. राज्यात या वसाहतींसाठी रायगडमधलं दिघी आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक

सिटीचा विस्तार सुमारे आठ हजार एकरांपर्यंत करण्याचा प्रस्ताव सरकारने तयार केला असून, या विस्तारीकरणात इटालियन कंपन्यांसाठी स्वतंत्र क्लस्टरची रचना केली जाणार आहे. या वसाहतीत इटालियन कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा दिल्या जाणार असून, यामध्ये इटालियन अभ्यासक्रमावर आधारित शाळा तसंच महाविद्यालयं, इटलीतील आरोग्य विमा योजनांना स्वीकारणारी हॉस्पिटल्स, तसंच एकत्रितपणे काम आणि निवास आदी सुविधांचा समावेश असेल. इथे होणाऱ्या गुंतवणुकीमुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील तसंच पायाभूत सुविधा अधिक विकसित होतील, असा विश्वास वर्तवला जात आहे.

**<><><><><>**

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागानं सायबर गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश करून २ कोटी ८० लाख रुपयांची क्रिप्टोकरन्सी जप्त केली आहे. सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठीच्या चक्र-५ या मोहिमेअंतर्गत झालेल्या या कारवाईत तीन ठिकाणी सीबीआयनं छापे टाकले.

**<><><><><>**

राजस्थानमध्ये जयपूरजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला, तर इतर सात जण जखमी झाले. यापैकी चौघे गंभीर आहेत. दौसा मनोहरपूर महामार्गावर एक कंटेनर आणि कार याच्यात समोरासमोर टक्कर झाली. यात कारमधलं नवविवाहित जोडपं आणि त्यांचे कुटुंबीय जागीच ठार झाले. जखमींवर जयपूर इथल्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

मणिपूर राज्यात खोऱ्यातल्या पाच जिल्ह्यांमध्ये आज सकाळी ५ पासून संध्याकाळी ५ पर्यंत जमावबंदी शिथिल केली आहे. इंटरनेट वापरावरचे निर्बंध मात्र कायम आहेत. इंफाळचा पूर्व आणि पश्चिम भाग, थोंबल, काकचिंग आणि बिष्णुपूर या भागांमध्ये अशांततेनंतर जमावबंदी लागू केली होती. राज्यात उद्भवलेल्या

हिंसाचाराला कारणीभूत असल्याच्या आरोपावरुन एका नेत्याला केंद्रीय गुप्तचर विभागाने ताब्यात घेतल्यानंतर या पाच जिल्ह्यांमध्ये होऊ लागलेल्या विरोधाच्या पार्शवभूमीवर हा जमावबंदीचा आदेश लागू केला होता.

**<><><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला आणि इतर तिघांना आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकात नेण्यासाठीची ॲक्झिओम-४ ही मोहीम दुसऱ्यांदा पुढे ढकलण्यात आली आहे. या मोहिमेचा आरंभ भारतीय प्रमाणवेळेनुसार आज संध्याकाळी साडेपाच वाजता होणार होता, मात्र फाल्कन ९ रॉकेटची चाचणी करत असताना यात द्रव ऑक्सिजनची गळती आढळून आल्यानं मोहीम स्थगित करण्याचा निर्णय नासानं घेतला. रॉकेटची डागडुजी पूर्ण झाल्यानंतर मोहिमेची नवी तारीख जाहीर केली जाईल, अशी माहिती नासानं दिली.

**<><><><>**

व्यापारातला तणाव कमी करण्यासाठीच्या प्राथमिक आराखड्यावर अमेरिका आणि चीन यांच्यात सहमती झाली आहे. अमेरिका आणि चीनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये लंडनमध्ये २ दिवस झालेल्या चर्चेनंतर ही सहमती झाली आहे. आता या व्यापार कराराचा आराखडा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांना मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे.

**<><><><>**

अमेरिकेतल्या लॉस एंजेलिस आणि कॅलिफोर्निया प्रांतांमध्ये कालपासून मर्यादित स्वरुपाची जमावबंदी लागू केली आहे. रात्री आठ ते सकाळी सहा या वेळात कर्फ्यू लागू असेल आणि तेथे कामासाठी येणाऱ्यांना तो लागू नसेल, असं गवर्नर कॅरेन बास यांनी स्पष्ट केलं.

**//<><><><>//**